# गोपी गीत

१४३३ ते

**प्रतीक - जयति तेऽधिकं**

**जयति तेऽधिकं जन्मना व्रजः श्रयत इंदिरा शश्वदत्र हि ।**
**दयित दृश्यतां दिक्षु तावकास्त्वयिधृतासवस्त्वां विचिन्वते ॥१॥**

ऐसे कोणेपरी । विनवू मी पूतनारी ।१।। जन्माची करंटी । केवि करू लक्ष्मीगोठी ।।२।। प्रिय वाटे काया । तुम्हा प्रिय तोंडमाया ।।३।। दिसा म्हणो डोळां । तरी नाही भाव भोळा ।।४।। दशदिशा पाहताहे । द्वैत भास मजला हे ।।५।। वाचे सांगे सर्वाभूती । मनामाजी देहासक्ति ।।६।। आंगी लावू गोपीगीता । कैसे आळंदीच्या नाथा ।।७।।

१४३४

**प्रतीक - शरदुदाशये**

**शरदुदाशये साधुजातसत्सरसिजोदरश्रीमृषा दृशा ।**
**सुरतनाथ तेऽशुल्कदासिका वरद निघ्नतो नेह किं वधः॥२**

शरत्कमळाची शोभा हरी दृष्टि । त्याहूनियां कोटी शोभा तिची ।।१।। मी तो चक्षुहीन, केवि तुम्हां जाया । वृन्दावनराया शोभेन की ।।२।। अशक्य गोष्टीची धरोनिया हाव । न ठेविता भाव चाळे करी ।।३।।
अमूल्य तुझिया दासी गोपीबाळा । मोल मी वेल्हाळा देह मागे ।।४।। चुकल्या कामाचा मागणे मुशारा । जीव निलाजरा बहु झाला ।।५।। माझ्या वधे तुम्हा न होय पातक । व्यभिचारी लोक दंडावे की ।।६।। परी तुम्ही दया करूनिया माझे । रक्षण सहजे करा स्वामी ।।७।। जितिया मेलिया द्यावा निजप्रेम । मृदु इच्छागम होय ऐसा ।।८।। आळंदीवल्लभा, पहा डोळेभरी । नुरवूनि उरी द्वैतभावा ।।९।।

१४३५

**प्रतीक :- विषजलाप्ययाद्**

**विषजलाप्ययाद् व्यालराक्षसाद् वर्षमारुताद् वैद्युतानलात् ।**
**वृषमयात्मजात् विश्वतोभयाद् ऋषभ ते वयं रक्षिता मुहुः॥३॥**

अल्पही वैषम्य नाही तुम्हा ठायी । आला मजलाही अनुभव ।।१।। सर्पा पासोनिया विषा पासोनिया । अग्नी पासोनिया गोकुळ ते ।।२।। रक्षिले अनंत वेळ चक्रपाणि । राक्षस मारोनि नानापरी ।।३।। ऐसे भक्तिमंत पाळिले सर्वदा । अभक्त मी सदा रक्षितसा ।।४।। भक्तिमंत गोपी आणि मजवरी । समकृपा पुरी दिसताहे ।।५।। उपकार गोपी आठविती सदा । विसरले पदा अखंड मी ।।६।। आळंदीवल्लभा, ऐसेही असोनि । निर्लज्ज होऊनि विनवीते ।।७।।

१४३६

**प्रतीक :- न खलु गोपिका**

**न खलु गोपिकानन्दनो भवानखिलदेहिनामन्तरात्मदृक् ।**
**विखनसार्थितो विश्वगुप्तये सख उदेयिवान्सात्वतां कुले ॥४॥**

निर्विकार तुम्हा सांगताति वेद । गोपिकांसी बोध अनादि तो ।।१।। कनक जाणोनि लीलेने भूषण । निजांगे भरून लेती गोपी ।।२।। सकळ जीवांचा जीव तूं गोविंद । आत्मप्रेमे छंद समाधीचा ।।३।। समाधि-व्युत्थानि तुझी प्रेमकळा । नित्य गोपीबाळा आठविती ।।४।। गोपी त्याचि तुम्ही, तुम्ही त्या गोपिका । माझे चित्ती निका दुजा भाव ।।५।। तुमच्या विरहे गोपिका गोविंद । तुम्ही गोपी शुद्ध तद्वियोगे ।।६।। गोपी-गोविंदी जो भेद पाहे तया । नव्हे व्रजराया भवत्कृपा ।।७।। गोपींसाठी तुम्ही जाहला सगुण । गोपींचे जनन तुम्हासाठी ।।८।। अवघे उसणे नरभावदृष्टि । मात्र माझे पोटी उरलेसे ।।९।। आळंदीवल्लभा, नव्हेचि साम्यता । परी माझी चिंता तुम्हां राहो ।।१०।।

१४३७

**प्रतीक :- विरचिताभयं**

**विरचिताभयं वृष्णिधूर्य ते चरणमीयुषां संसृतेर्भयात् ।**
**करसरोरुहं कान्त कामदं शिरसि धेहि नःश्रीकरग्रहम् ॥५॥**

नसतेचि भय धरिले मानसी । अभय तुम्हासी मागताहे ।।१।। गोपींचे अभय अखंड जवळी । नाही भयरळी पळमात्र ।।२।। भय ते लागले आमुचिया पाठी । अभय यासाठी याचिताहो ।।३।। आम्हां-समानासी अभय न द्यावे । स्मृतीने बोलावे जरी ऐसे ।।४।। तरी नाही तुम्हा फळ कोणे काळी । यास्तव न पाळी नीति येथे ।।५।। मजसाठी सोडा स्मृतींची मर्यादा । श्रीकृष्णा मुकुंदा प्रियकरा ।।६।। इंदिरा जयाचे करिते ग्रहण । तो हस्त स्थापन माझे माथा ।।७।। करावा म्हणोनि करिते प्रार्थना । आळंदीजीवना मायबापा ।।८।।

१४३८

**प्रतीक :- व्रजजनार्तिहन्**

**व्रजजनार्तिहन् वीर योषितां निजजनस्मयध्वंसनस्मित ।**
**भज सखे भवत्किंकरीःस्म नो जलरुहाननं चारु दर्शय॥६॥**

वीर मधुमुरमर्दन गोविंदा । निवारा आपदा सर्व काही ।।१।। पुरविता तुम्ही व्रजाची कामना । टाकू नये दीना आणिकाही ।।२।। तुमचिया दासी जाहल्या युवति । परि मजप्रति तेही नोहे ।।३।। दासी म्हणविता आनंद वाटत । मानस रक्षीत शरीराते ।।४।। दाखवावे मज कमळवदन । करुणा आपण करोनियां ।।५।। सूर्य प्रगटता काय द्वेषी कोणा । कोणाच्या नयना झांकुळी तो ।।६।। तुम्ही तो उदार स्वामी तयाहुनी । दिसावे लोचनी मजलाही ।।७।। आळंदीवल्लभा जीवीच्या जीवना । एवढी प्रार्थना अंगीकारा ।।८।।

१४३९

**प्रतीक - प्रणतदेहिनां**

**प्रणतदेहिनां पापकर्षनं तृणचरानुगं श्रीनिकेतनम् ।**
**फणिफणार्पितं ते पदाम्बुजं कृणु कुचेषु नःकृन्धि हृच्छयम्॥७॥**

दीने विनविता त्वरे घेता धाव । न धरूनि लव मोटेपणा ॥१॥ जया चरणांची सिंधुकन्या दासी । ते पाय वनासी लागले या ॥२॥ गाई चारतांना उद्धरिली मही । नाचूनिया अहि मुक्त केला ॥३॥
प्रणत जनांचे अपाय उपाय । होती ते हे पाय गोपीस्तनी ॥४॥ माझे तंव मन त्याहूनि कठिण । कैसी विनवण मान्य होय ॥५॥ आळंदीवल्लभा वृंदावनईशा । पुरवावी आशा कामताता ॥६॥

१४४०

**प्रतीक - मधुरया गिरा**

**मधुरया गिरा वल्गुवाक्यया बुधमनोज्ञया पुष्करेक्षण ।**
**विधिकरीरिमा वीर मुह्यतीरधरसीधुनाप्याययस्व नः ॥८॥**

कमललोचना पूतनाशोषणा । गोकुळभूषणा दीनबंधु ॥१॥ वाढलासे मोह जीवी आमुचिया । तुम्ही देवराया निवटावा ॥२॥ जगतासी तुच्छ पाहती ब्रह्मज्ञ । तयांना मनोज्ञ भवद्वाणी ॥३॥ आम्हांसी अधरपीयूष पाजोन । द्यावे जीवदान आर्तबंधो ॥४॥ ऐसे गोपीसम मज भाग्य कैचे । तथापि मी याचे हेचि एक ॥५॥ गोपीपादांगुष्ठजीवन पाजोनि । अधिकारी गुणी मज कीजे ॥६॥ आळंदीवल्लभा, माझे गुणदोष । पहाता तुम्हांस लाभ नाही ॥७॥

१४४१

**प्रतीक - तव कथामृतं**

**तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् श्रवणमंगलं श्रीमदाततं भुवि गृणन्ति ते भूरिदा जनाः ॥९॥**

अमृताहून गोड तुमची सुकथा । श्रवणेचि व्यथा निवारी जे ॥१॥ नेणो या संसारी पाप न जन्मले । नाम प्रकटले जैंपासोनि ॥२॥ नित्य भांडवल उघडिले संती । मोलाविण देती सकळासी ॥३॥ रामकृष्ण हरी गोविंद गोपाळ । विष्णु व्रजपाळ नारायण ॥४॥ ऐसी नांवे गाती करूनि कीर्तन । होतसे दहन कर्माऽकर्म ॥५॥ सकळ कवींनी वर्णिले स्वभावे । दिले संतदेवे सर्वकाळ ॥६॥ जीमूतवाहने कल्पवृक्ष दिला । टेंगणा तो झाला कथादानी ॥७॥ परी मी आळसी न जाये कीर्तना । न लावी चिंतना नामी रूपी ॥८॥ आळंदीवल्लभा, नितातला जीव । वेगी घाला धाव मायबापा ॥९॥

१४४२

**प्रतीक - प्रहसितं प्रिय**

**प्रहसितं प्रिय प्रेमवीक्षणं विहरणं च ते ध्यानमंगलम् ।**
**रहसि संविदो या हृदिस्पृशःकुहक नो मनःक्षोभयन्तिहि ॥१०॥**

हासणे बोलणे सदा गोजिरवाणे । प्रेमाने पाहणे आर्द्र दृष्टी ॥१॥ चालणे खेळणे मुरडवी मना । बळे लावी ध्याना भवत्यागे ॥२॥ एकांतीच्या लीला हरिती हृदय । होऊनि सदय रक्षिजे की ॥३॥ मज नाही लव हा तो अनुभव । ध्यानी नाही धाव चित्ताचीही ॥४॥ आळंदीवल्लभा स्वामी ज्ञानराज । राखा माझी लाज लीलेसाठी ॥५॥

१४४३

**प्रतीक - चलसि यद्व्रजात्**

**चलसि यद्व्रजाच्चारयन्पशून् नलिनसुन्दरं नाथ ते पदम् ।**
**शिलतृणांकुरैः सीदतीति नःकलिलतां मनःकांत गच्छति ॥११॥**

गाई चारावया जाणे होय वनी । रुपति चरणि कंटकादि ॥१॥ कमळपरागाहूनि सुकुमार । हिंडती अपार रानी रानी ॥२॥ म्हणोनिया मना आमुचिया खेद । स्मरती गोविंद गोपीबाळा ॥३॥ मी एक वेगळी भलतेचि करी । न स्मरता भरी बळे रागे ॥४॥ स्मरता गोपाळा नित्य करी उभे । एक न ये शोभे प्रेमकर्म ॥५॥ आळंदीवल्लभा सर्व क्षमा करा । हृदय विस्तारा स्नेहामृते ॥६॥

१४४४

**प्रतीक - दिनपरिक्षये**

**दिनपरिक्षये नीलकुन्तलैर्वनरुहाननं बिभ्रदावृतम् ।**
**घनरजस्वलं दर्शयन्मुहुर्मनसि नः स्मरं वीर यच्छसि ॥१२॥**

परतता वनीहूनि सायंकाळी । गोचरणधुळीयुक्त अंग ॥१॥ जलज सुंदर वदन सांवळे । नेसले पिवळे वस्त्र कटी ॥२॥ वनमाळा कंठी, वाजवीत पावा । गोपीमनोभावा आकर्षीत ॥३॥ पाहता आमुची मने कामचारी । न घेती अंतरी दासभाव ॥४॥ वियोगा वाचोनि संयोगाचे सुख । वासना अनेक उपजवी ॥५॥ गोपींची ही स्थिति, माझी कोण गति । तुम्हा ठावे चित्ती सर्व स्वामी ॥६॥ चंद्रासी कलंक, दीपा पुसे कोण । काजळ भरून राहत जो ॥७॥ आळंदी- वल्लभा, निज नामासाठी । मजसम कोटि उद्धरावे ॥८॥

१४४५

**प्रतीक - प्रणतकामदं**

**प्रणतकामदं पद्मजार्चितं धरणिमण्डनं ध्येयमापदि ।**
**चरणपंकजं शंतमं च ते रमण नः स्तनेष्वर्पयाधिहन् ॥१३॥**

नमस्कारमात्रे काम पुरविता । आणिक तो चित्ता भाव नाही ॥१॥ एक वेळ जीव आपुला म्हणता । अभय सर्वथा तया मिळे ॥२॥ मग गुणदोष न देखता त्याचे । निजपद साचे समर्पिता ॥३॥ ब्रह्मदेव पूजी सहस्रकमळे । गोकुळी सावळे क्रीडे ते हे ॥४॥ शूलपाणि माथा वाहे पायवणी । दासाचे आंगणी खेळत ते ॥५॥ पृथवीची शोभा, जीवाचे जीवन । आपत्तिहरण देवपाय ॥६॥ ज्ञानेश्वरस्वामी आळंदीवल्लभु । पाविजे स्वयंभु निजदासा ॥७॥

१४४६ / पद

'नंदाच्या नंदना' या चालीवर.

पाय तुझे माधवा । पुनित करिति अति पतिताहि जना, दाखविसी जेधवा।।ध्रु।। जे नव नौका भवा । सर्व गर्व परिहरुनि आपुला, पूजित पद्मोद्भवा ।। आवडती जे भवा । दासास्तव कोटि श्रम करुनी, जे पावति संभवा ।। (चाल) ते विसरे नच मना । सांडूनिया विषयवमना । करिजे हरिपदकामना ।

(टीप) काम तुझे पुरवील दयाळू, आठविसी जेधवा ।। पाय तुझे०।।१।।

संकट पडले जरी ।। अति तुज ।।

पीतवसनकटिधारक हरि तो, स्मर निर्भय अंतरी ।।

ज्याची धरणी अंतुरी । साजे सुंदर चरणकमल सुकुमार धरूनि अंतरी ।।

(चाल) कल्याणनिधानहि खरे । वदने हरिति दुःख रे ।। अस्मत् स्तनि करुणा रे ।।

(टीप) ठेवुनि मानस ताप हरावा, श्रीअलकावतिधवा ।। पाय०।।२।।

१४४७

**प्रतीक - सुरतवर्धनं**

**सुरतवर्धनं शोकनाशनं स्वरितवेणुना सुष्टु चुम्बितम् ।**
**इतररागविस्मारणं नृणां वितर वीर नस्तेऽ धरामृतम् ॥१४॥**

लाचावला जीव हा आवरेना । जाऊ पाहे सोडोनि तनुमना । लुब्ध झाले हृदय तुझ्या गुणा । दया येऊ दे बा विश्वाच्या जीवना ।। लाचावला०।।धृ०।।

विषयांची विचित्र आहे गति । भोगी त्याची वाढविती निजरति । विषयांचा सार तूं विषयपति । चुंबन तुझे वाढविते सुरति ।। लाचावला०।।१।।

रति विषयांची वाढविते दुःख । तुझे सुरत हे निवारिते शोक । जड वेणु चुंबता तुझे मुख । सुस्वर गावोनि देतो आम्हा सुख ।। लाचवला०।।२।।

उदार तूं सर्वत्र सर्वदानी । आम्हा वाचवी चुंबन देवोनी । अधरामृते अमर करोनी । सेवे लावी भव हा निवारोनी ।। लाचावला०।।३।।

दीनबंधु हो पतितपावना । प्राणनाथा जी आळंदीजीवना । माझी सान विनंति मनि आणा । करणे उचित ते कैसे तुम्ही जाणा ।। लाचावला०।।४।।

१४४८

**प्रतीक - अटति यद्भवान्**

**अटति यद्भवानह्नि काननं त्रुटिर्युगायते त्वामपश्यताम् ।**
**कुटिलकुन्तलं श्रीमुखंच ते जड उदीक्षतां पक्ष्मकृद्दृशाम्॥१५**

प्राणपूज्य पाय हिंडती काननी । माये अनुदिनी कोवळिये ।।१।। कल्पयुगसम निमिष तै होय । दिनी व्रजराय न पाहता ।।२।। केशचि कुटिळ आणिक सरळ । वदनकमळ पाहती जे ।।३।। पापण्या निर्मिल्या ब्रह्मदेवे काह्या । म्हणूनिया तया शिव्या देती ।।४।। निमिष न साहे तुमचा विक्षेप । मी तंव आक्षेप तर्के करी ।।५।। आळंदीवल्लभा, कोण्या गुणे मज । म्हणाल की निजपददासी ।।६।।

१४४९ / पद

**प्रतीक - पतिसुतान्वय**

**पतिसुतान्वयभ्रातृबान्धवानतिविलंघ्य तेऽच्युतागताः ।**
**गतिविदस्तवोद्गीतमोहिताः कितव योषितःकस्त्यजेन्निशि ॥१६॥**

अंतरि जरि भरंवसा, भय तरि वाटत, यदुराया । त्यासहि तुम्हि सोडिले, विनटले जे अक्षय पाया ।। धृ०।।

पहा म्हणती गोपी आम्ही त्यजुनि पतिसुतमाया । काननि आनन उघडुनि गातो तुमच्या नामा या । तदपि कपटरजनीत बुडालो अवघ्या हरिजाया । अशा प्रेमळां यापरि गति मग आम्हि कोण बाया ।।

(चाल) आधार परंतु तुम्हाविना आन ना । यासाठि विनवितो करुनि दीन आनना । मुनि सांगति हा पथ परम, किमपि सान ना ।। (चाल पहिली) कसे पतित मी म्हणुनि नवल करुनि तरि भेटा या । भवच्चरणदर्शनस्मरण मग दाविल निज ठाया ।। अंतरि जरि ।।१।।

उदार जगतीतळी तुम्हाविण कोण आन असला । पुरविल झणि आवडी म्हणुनिया विचिंत मनि बसला ।। पाहु परीक्षा म्हणुनि याल तरि, जाल सहज फसला । उगाळता कोळसा उजळ ना, म्हणुनि कोण रुसला ।।

(चाल) बिरुदावलि गाती नित्य निगम मुनि नवी ।। ती साच असो द्या कीर्ति करुनि मानवी ।। आळंदिवल्लभा, घ्या मजला पालवी ।। (चाल पहिली) चरणजूतिरज पुसायासि तरि करावी निजजाया ।। प्राणनाथ तुम्हि, लाथ हणुनि, मम सरल करा काया ।। अंतरि जरि भरंवसा ०।।२।।

१४५०

**प्रतीक – रहसि संविदम्**

**रहसि संविदं हृच्छयोदयं प्रहसिताननं प्रेमवीक्षणम् ।**
**बृहदुरः श्रियो वीक्ष्य धाम ते मुहुरतिस्पृहा मुह्यते मनः ॥१७॥**

मधुर बोलणे, एकांतीचे सुख । सदा हास्यमुख प्रेमदृष्टि ।।१।। म्हणू तुम्हा नाही अगुणा स्त्रीचाड । उरावरी गोड लक्ष्मी कां हे ।।२।। पाहिले तथापि वाढतीच आशा । पायी जगदीशा ठेवा आम्हा ।।३।। ऐसे प्रेमळाचे ऐकूनि गायन । धन्य मानी मन आपणाते ।।४।। ऐशा प्रेमळांचा न करीन हेवा । मानसीच सेवा आरंभीन ।।५।। आळंदीवल्लभा, सिद्धी न्या ते तरी । आवडो अंतरी गोपीपाय ।।६।।

***- इति गोपीगीतम०***
***//***

.....................................................

व्रजवनौकसां व्यक्तिरंग ते वृजिनहंत्र्यलं विश्वमंगलम् । त्यज मनाक् च नस्त्वत्स्पृहात्मनां स्वजनहृद्दशां यन्निषूदनम् ।।षु । तेनाटवीमटसि तद्व्यथते न किंस्वित् । कूर्पादिभिर्भ्रमति धीर्भवदायुषां नः ॥१९॥ इति गोप्यः प्रगायन्तः प्रलपन्त्श्च चित्रधा । रुरुदुः सुस्वरं राजन्कृष्णदर्शनलालसाः ॥२०॥ तासामाविरभूच्छौरिः स्मयमानमुखाम्बुजः। पीताम्बरधरःस्त्रग्वी साक्षान्मन्मथमन्मथः॥२१॥ तं विलोक्यागतं प्रेष्ठं प्रीत्युत्फुल्लदृशोऽबलाः । उत्तस्थुर्युगपत्सर्वास्तन्वः प्राणमिवागतम् ॥२२॥ भागवत.॥

*(पुढील १८ ते २२ श्लोकांचे रूपांतर उपलब्ध नाही.)*

